# प्रकरण - दुसरे

# ‘अन्नदात्याची धुळाक्षरे’ मधील आशय व आकृतिबंध

# प्रकरण - दुसरे

# 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आशय व आकृतिबंध

## १. प्रस्तावना :-

१९८० नंतरच्या काही निवडक कवींनी अभंग आकृतिबंधाची खंडीत झालेली परंपरा पुनरुज्जीवित केली आणि ग्रामीण जीवन अभंग आकृतिबंधातून मांडण्याचा प्रयत्न केला. अशा आधुनिक कवींच्या अभंगरूपी कवितेचा संशोधनाच्या पातळीवर अभ्यास होणे गरजेचे आहे. श्रीकांत देशमुख यांच्या 'बळिवंत' मधून व भगवान ठग यांच्या 'अन्नदात्याची धुळाक्षरे' या कवितासंग्रहातून कृषिसंस्कृती आणि कृषिसंस्कृतीशी निगडित असणारे विविध घटक, बळिराजा व त्याचा जीवनानुभव मोठ्या ताकतीने अभंग आकृतिबंधातून प्रकट झाला आहे. या प्रकरणात 'अन्नदात्याची धुळाक्षरे' ह्या कविता संग्रहातील कवितांचा आशय आणि आकृतिबंधाच्या दृष्टीने अभ्यास मांडला जाणार आहे.

## २. कवी परिचय :-

कवी भगवान ठग हे विशेषत: १९८० नंतरच्या तिसऱ्या पिढीतील एक दमदार कवी आहेत. कवी ठग हे मुळचे विदर्भातील असून त्यांचे बुलढाणा शहरात वास्तव्य आहे. ठगांचा जन्म मूळ शेतकरी कुटुंबात झाला आहे. पण नोकरी व्यवसायामुळे ते आज मध्यम वर्गात स्थिर झाले आहेत. विदर्भाचा भाग बघितला तर तसा अतिमागास, या प्रदेशात निसर्गाचा सतत दुष्काळ पाहायला मिळतो. अशा प्रदेशातील बळिराजाचे मन जाणणारा, त्याचे दु:ख समजून घेणारा आणि जाणिवेच्या, संवेदनेच्या पातळीवर जाऊन त्याचे दु:ख कवितेतून शब्दबद्ध करणारा हा समंजस कवी आहे. भगवान ठगांची मोजकेच पण चांगले सांगणारी अशी कविता त्यांच्या 'अन्नदात्याची धुळाक्षरे' या काव्यसंग्रहातून प्रतीत झाली आहे. अशा या प्रगल्भ जाणीवेच्या कवीचे अलीकडेच २२ जानेवारी २००९ ला निधन झाले आहे.

## ३. वाङ्मयीन कर्तृत्व :-

कवी भगवान ठग यांच्या 'अन्नदात्याची धुळाक्षरे' या कवितासंग्रहाच्या शीर्षकावरूनच त्यांच्या बहुश्रुत व्यासंगाची साक्ष रसिक, वाचक-अभ्यासकांना पटते. कवी भगवान ठग यांचे काव्यलेखन, विविध भाषेतील अनुवादित साहित्य व समिक्षात्मक लेखन प्रसिद्ध आहे. कवी ठग यांचे मराठी, हिंदी, इंग्रजी, इटाली, जपानी, मणिपुरी इ. भाषांवर प्रभुत्व आहे. पण तरीही मराठी ग्रामीण कविता हा त्यांच्या जिव्हाळ्याचा प्रांत आहे. कारण जे जीवन जवळून पाहिले, अनुभवले ते जीवन मांडण्यासाठी त्यांचे

कवीमन नेहमी आसुसलेले असते. त्यांचे एकूण दहा कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये 'क्षणकाव्य',आत्मपक्षी', 'युद्ध', 'सर्व काही मातीचे', 'अनर्थ', 'वाळवीची कुळे', 'कथा बिंद्रा वनाची', 'माझ्या आत्म्याच्या चुंबकीय परिघात', 'रक्त फुलांचं पीक सांभाळण्यासाठी' आणि 'अन्नदात्याची धुळाक्षरे' (२००६) इ. चा समावेश आहे.

कवी भगवान ठग यांचे अनुवादित साहित्य बहुसंख्य आहे. त्यामध्ये 'आधुनिक मणिपुरी कविता', 'तसलिमा नसरिनची कविता', 'पृथ्वीवरील प्रतिभावंत', 'आक्टोवियो पाज यांच्या निवडक कविता', जपानी कविता, इटाली कविता, 'आधुनिक ब्राह्मी कविता', 'मास्कोतील पत्र आणि काही कविता', 'आधुनिक बल्गेरियन कविता', 'पूर्वाई', रमाकांत रथ यांच्या कविता इ. चा समावेश होतो.

याशिवाय कवी ठग यांनी संपादित मराठी व इंग्रजी कवितेचे लेखन केले आहे. तर 'आधुनिक मराठी कवितेचं पीकपाणी' व 'समकालीन मराठी कवी व कविता' हे त्यांचे दोन समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याखेरीज 'अनुवाद', 'विश्ववाङ्मय', 'तुका म्हणे' या अनियतकालिकांचे ते संपादक आहेत.

## ४. कवितेतील ग्रामीणता :-

सातशे वर्षाची दीर्घ परंपरा असलेल्या मराठी कवितेला संत ज्ञानेश्वरांनी अमृतमय शब्दातून आविष्कृत केले. संत नामदेव, एकनाथ आणि तुकारामादी संतांनी विठ्ठल भक्तीचा महिमा आणि सदाचरणाचा मार्ग आपल्याला साध्या, सरळ, काव्यमय भाषेतून प्रकट करून सांगितला. अव्वल इंग्रजी कालखंडात काव्याच्या प्रांतात अनेक स्थित्यंतरे झाली. इंग्रजी काव्याची मराठीत भाषांतरे होऊ लागली. प्राचीन परंपरेत आणि वृत्त, रचना, छंदात बंदिस्त झालेल्या मराठी कवितेला आधुनिकतेकडे जाणीवपूर्वक वळविण्याचे काम कवी केशवसुतांनी केले. रविकिरण मंडळातील कवींनी सामान्य माणसांच्या भावभावनांना, कौटुंबिक विषयांना कवितेत स्थान देऊन, काव्यगायनाची प्रथा रूढ करून मराठी कविता लोकप्रिय केली. बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, वसंत बापट, नारायण सुर्वे, मंगेश पाडगावकर, यासारख्या परस्परभिन्न प्रकृतीच्या आणि प्रवृत्तीच्या कवींनी स्वातंत्र्य, समता, मानव केंद्रितता, सामाजिक, राष्ट्रीय जाणिवांचा आविष्कार आपल्या काव्यातून प्रतीत केला. बहिणाबाई चौधरीच्या अक्षरवाङ्मयाने मराठी कवितेचा प्रांत समृद्ध आणि वैभवसंपन्न झाला.

नारायण सुर्वे, दया पवार, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे, भुजंग मेश्राम, अरूण कांबळे आणि त्यांच्या समकालीन कवींनी आपल्यावर केलेल्या अन्याय, अत्याचाराचा हिशोब आपल्या कवितेतून नकार आणि विद्रोहाच्या भाषेत आत्मनिष्ठ पातळीवर प्रकट केला. त्यामुळे आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने मराठी कविता प्रगल्भतेच्या आणि पक्वतेच्या स्तरावर जाऊन पोहोचली आहे.

आनंद यादव, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, राजन गवस यासारख्या श्रेष्ठ कवींनी ग्रामीण मराठी कवितेचे दालन उघडून, ते दालन समृद्ध, कसदार करण्यामध्ये महत्त्वाचा वाटा उचलला.

आज मराठी ग्रामीण कवितेमध्ये तिसरी पिढी अधिक जोरदारपणे पुढे येताना दिसते आहे. बेरोजगारी, भ्रष्टाचार, बेकारी, माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण जीवनात प्रवेश, खेड्याने धारण केलेले शहराचे रूप, शेतकऱ्याचे जीवन, त्यांच्या आत्महत्या, दुष्काळ, शेती उत्पादनांना न मिळणारा रास्त भाव, असे आणि यासारखे कितीतरी विषय आज तिसऱ्या पिढीतील पुरूषोत्तम पाटील, राजा महाजन, प्रकाश होळकर, सोपान हाळमकर, उत्तम कोळगांवकर, शंकर गायधनी, एकनाथ देशमुख, श्रीकांत देशमुख, भगवान ठग, मधुकर केचे इ. कवी समर्थपणे हाताळत आहेत. पण ग्रामीण साहित्याचा प्रवाह अस्तित्वात येण्याअगोदरही म. फुले यांनी कृषिसंस्कृतीचा प्रमुख घटक असलेल्या शेतकऱ्यांचे दु:ख व त्यांचे प्रश्न 'शेतकऱ्यांचा आसूड' (१८८३) या आपल्या ग्रंथातून मांडले आहेत. आनंद यादव म्हणतात - ''महाराष्ट्राच्या इतिहासात शेतकऱ्यांचे मन जाणणारा व सुधारणेच्या दिशेने त्याला प्रथम गती देऊ इच्छिणारा तो पहिला कृतीशील महात्मा होता.''[१] त्यामुळे ग्रामीण जीवन साहित्यात आणण्याचा पहिला प्रयत्न म. फुलेंनी केला आहे असे दिसून येते.

## ५. अन्नदात्याची धुळाक्षरे : शीर्षकाची यथार्थता :-

ज्या बळिराजाच्या आयुष्याची धुळधाण झाली, ज्याचे आयुष्य कवडीमोल झाले आहे, मातीमोल झाले आहे. अशा अन्नदात्याच्या वेदनेची, दु:खाची, त्याच्या प्राक्तन भोगाची कवी भगवान ठगांनी अक्षरांतून मांडणी केली आहे. हीच या शीर्षकाची यथार्थता होय.

'अन्नदात्याची धुळाक्षरे' या भगवान ठगांच्या प्रस्तुत कवितासंग्रहात एकूण १०३ कविता समाविष्ट आहेत. त्यातील प्रत्येक कवितांचा बारकाईने अभ्यास करून त्या काव्यसंग्रहातून शेतकऱ्यांच्या वेदनेचे, दु:खाचे स्वरूप कोणते ? शेतकऱ्यांच्या वैफल्यग्रस्ततेची, आत्महत्येची नेमकी कारणे कोणती? शेतकऱ्यांच्या वाट्याला आर्थिक मागासलेपण का आले ? याला कोणती व्यवस्था जबाबदार आहे. याशिवाय या ग्रामीण कवितेचा घाट, आकृतिबंध, आविष्कारशैली कोणत्या प्रकारची आहे, काव्यसंग्रहातून नेमकी कोणती वैशिष्ट्ये प्रतीत झालेली आहेत. या सर्व बाबींचा चिकित्सक अभ्यास इथे मांडण्याचा प्रयत्न आहे.

'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आशय - कृषिव्यवस्था राष्ट्राचा पाया, बळिराजाचे जीवन आभाळ अन् मातीशी, समाजाचा उदरनिर्वाह चालविणारा काबाडाचा धनी, अविरत कष्ट करणारा बळिराजा, काळी माती साता जन्माची आई, बळिराजाचे दु:ख आणि वेदना, वैफल्यग्रस्त अन्नदाता, बळिराजाचे अर्थहीन कष्ट व सोशिक जीवन, पाऊस हाच परमेश्वर, बळिराजाच्या दुस्थितीला जबाबदार घटक, बळिराजा जवाएवढ्या सुखाचा धनी या मुद्यांच्या आधारे मांडला आहे.

'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध - 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध बळिराजाचा जीवनानुभव व्यक्त करणारा, 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध भावनेपेक्षा विचाराला प्राधान्य देणारा, 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध बळिराजाची अनेकविध रूपे साकारणारा , 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंधातून लोकसाहित्याला व संतसाहित्याला स्पर्श, अन्नदात्याची धुळाक्षरे मधील प्रतिमा व प्रतीके, 'अन्नदात्याची धुळाक्षरे'मधून प्रतीत झालेले अलंकार, 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील वाक्प्रचार सदृश्य रचना, 'अन्नदात्याची धुळाक्षरे'मध्ये हिंदी व संस्कृत भाषेतील शब्दांचे मिश्रण, 'अन्नदात्याची धुळाक्षरे'मधील आविष्काराचे स्वरूप इ. मुद्यांच्या आधारे मांडला आहे.

## ६. 'अन्नदात्याची धुळाक्षरे'मधील आशय :-

कवी भगवान ठग यांनी 'अन्नदात्याची घुळाक्षरे' मधून बळिवंताचे दु:ख, वेदना व त्याच्यापुढील समस्या चित्रीत केल्या आहेत. बळिवंताचे जीवन चित्रीत करताना कवी भगवान ठगांनी कृषिसंस्कृती आणि कृषिसंस्कृतीशी निगडीत असलेले विविध घटक आपल्या कवितेतून प्रतिबिंबीत केले आहेत. ''खेडेगांव तेथील जीवनपद्धती, तेथील खास रीती, शेती, तेथील निसर्ग, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या या साऱ्यांचा त्यांनी ग्रामीण या कक्षेत अंतर्भाव केला आहे.''[२] ही ग्रामीण जीवनाची वैशिष्ट्ये कवी भगवान ठगांच्या कवितेत कमी-अधिक प्रमाणात दिसून येतात.

### ६.१ कृषिव्यवस्था हा राष्ट्राचा पाया :-

कृषिव्यवस्था ही भारतीय जीवनाचा पाया आहे. ''कृषिमूलहि जीवनम्'' कृषी ही मानवी जीवन-व्यवस्थेचा पाया आहे. आपल्या जीवनाचे मूळ आहे. कृषिप्रधानता ही आदिम स्वरूपाची संस्कृती म्हणून सांगितली जाते. धर्मग्रंथांनी आणि धार्मिक विचारवंतांनी भाकरीत परमेश्वर असल्याचे

सांगितले. हिंदू धर्मात अन्नाला परब्रह्म म्हटलेले आहे. 'बायबल' मध्ये गॉड तर 'कुराणा'त अल्ला म्हटलेले आहे. या भाकरीच्या प्राप्तीसाठीच समाज घडतो आहे. इतिहासाचा प्रारंभच भाकरीसाठी, भाकरीतून व भाकरीकडेच होत असल्याचे सांगितले आहे.''[३] म्हणूनच भाकरी निर्माण करणारी कृषिव्यवस्था हा राष्ट्राचा पाया ठरते. कवी भगवान ठग यांनी आपल्या कवितेमधून कृषिव्यवस्थेचे महत्त्व आणि बळिराजाचे दु:ख विशद केले आहे.

बळिराजा हा स्वत: उपाशी राहून जगाच्या भरणपोषणासाठी मातीत घाम गाळतो आणि जगाची भूक भागवितो. जगाची भूक भागविणारा हा पोशिंदा जगाची काळजी करतो पण त्या बळिराजाची काळजी इथली व्यवस्था करत नाही की त्याच्या घामाचे मोल त्याला देत नाही. उलट त्याच्याच घामाचा बळी इथली व्यवस्था घेते.

**आहेस पोशिंदा**
**तू या जगाचा**
**तूझ्याच घामाचा**
**बळी गेला** (पृ. १०)

वरील पद्यपंक्तीतून सध्याच्या कृषिव्यवस्थेचे चित्र कवीने रेखाटले आहे.

## ६.२ बळिराजाचे जीवन आभाळ अन् मातीशी :-

आभाळ आणि माती हे कृषिसंस्कृतीशी निगडीत असलेले दोन प्रमुख घटक आहे. माती हेच आपलं घर आणि आभाळ हेच आपले छत्र मानून बळिराजा आपल्या आयुष्याचा प्रवास करत असतो. त्यामुळे बळिराजाच्या जीवनात आभाळ आणि मातीला फार महत्त्वाचे स्थान आहे. ''भुई हे निर्मितीचे प्रतीक, ती भुई अनेक आघात सहन करते. निसर्गातल्या विविध ऋतुंचे प्रहार झेलते. माणसालाआपल्या शिरावर घेऊन जीवनाचा आधार देते. त्याच्या भरणपोषणाचे सर्व काही करते.''

''नभ हे देखील विशालतेची प्रतिमा घेऊन येते. नुसते विशालत्व हेच या नभाचे वैशिष्ट्य नाही. विविध ऋतुमानात होणारे बदल आपल्यात सामावून घेऊन विविध रंगाच्या ढंगाची उधळण करते. नभाशी, शेतीशी निगडीत माणसांचे जीवन बांधले आहे. नभ हे उन्हाच्या पावसाच्या निर्मितीचे केंद्र आहे.''[४] असे हे आभाळ अन् मातीचे बळिराजाच्या जीवनात महत्त्व आहे.

आभाळ अन् मातीनी व्याप्त असलेले बळिराजाचे जीवन कवी भगवान ठग यांनी 'आणभाक', 'रक्तफुले', 'संवादी', 'आयुष्याचा', 'महादेवा', 'चेहरा', 'आयुष्य', 'नागमोडी' या कवितेतून चित्रबद्ध केले आहे.

'आणभाक' या कवितेमध्ये बळिराजा जन्मल्यापासून ते मरेपर्यंत मातीत राबतो. आयुष्याच्या शेवटपर्यंत बळिराजा मातीला अन् माती बळिराजाला सोडत नाही. म्हणून कृषिपरंपरेत बळिराजाचा त्या मातीबरोबर विवाह झालेला असतो असा एक पारंपारिक संकेत आहे. पण प्रस्तुत कवितेत बळिराजा मातीत राबूनही त्याला दोन वेळची भाकरी पुरती मिळत नाही तेव्हा

**गच्च अंधारात**
**लपविला दाह**
**मातीशी विवाह**
**कुणी केला ?** (पृ. ८)

अशा मातीशी विवाह कुणी केला ? असा प्रश्न बळिराजा उपस्थित करतो. प्रस्तुत कवितेतून कवीने बळिराजाच्या मनाला मोकळी वाट करून दिली आहे.

'रक्तफुले' या कवितेमध्ये मानवाच्या दुष्कृत्यामुळे निसर्ग बोचरा, पोरका होतो. तेव्हा निसर्गाचाच एक भाग असलेल्या आभाळापुढे प्रश्न निर्माण होतो.

**कुणासाठी व्हावा**
**विठ्ठल सावळा**
**आणि निळा काळा**
**चंद्रकडा** (पृ. २२)

मानवाने निसर्गाचा संहार केल्यामुळे आभाळाला झालेले दु:ख प्रस्तुत कवितेतून कवीने व्यक्त केले आहे.

'आयुष्याचा' या कवितेमध्ये बळिराजाने मातीत राबण्याचे व मातीतच संपण्याचे व्रत स्वीकारलले असते. म्हणून बळिराजा आपल्या वाट्याला आलेल्या दु:खाचा टेंभा न मिरविता तो सोशिकवृत्तीने ते दु:ख सहन करतो. आणि मातीरूपी जात्यामध्ये स्वत:ला भरडून घेऊन आयुष्याचा पाश हळूहळू कमी करत जातो.

**जात्यामध्ये आता**

**देह भरडला**

**पाशही सुटला**

**आयुष्याचा** (पृ. २८)

बळिराजाचे जीवन मातीशी किती एकरूप झालेले आहे याची प्रचिती कवी ठगांच्या कवितेतून येते.

'रक्त' या कवितेमध्ये मरणच आपलं जगणं आहे, आपलं दु:खच एकुलतं एक सुख आहे. असं समजून आपलं जीवन व्यतीत करणारा बळिराजा आपल्या पायाखालच्या मातीला मनापासून जपतो. शिवारातील पिकाला रक्ताच्या थेंबाने न्हाऊ घालतो.

**पायाखाली माती**

**जन्म दु:खभर**

**आणि फुलावर**

**रक्त थेंब** (पृ. ३१)

वरील पद्य पंक्तीतून बळिराजा आपल्या मातीची आणि पिकाची किती अतोनात काळजी घेतो याची प्रचिती येते.

तर 'चेहरा' या कवितेमध्ये ज्या मातीच्या कुशीमध्ये माणसांचा जन्म होतो. त्याच मातीच्या कुशीमध्ये माणसाचे वैभव दडलेले असते. असा आशय चित्रीत केला आहे. बळिराजाला कुणाच्या पाठीमागे जाण्याची, कुणापुढे हात पसरण्याची, कुणापुढे भीक मागण्याची गरज नाही, कारण त्या मातीच्या कुशीतच त्याचे वैभव दडलेले आहे. फक्त त्याकडे बळिराजाने नीट पाहण्याची गरज आहे.

**कुशीमध्ये माती**

**मातीत वैभव**

**तरीही आर्जव**

**कशासाठी** (पृ. ९)

अशा रीतीने बळिराजाने कुणापुढेही संघर्ष, विनंती, आर्जवा करू नये अशी कवीची शिकवण आहे.

'बीजांच्या संगती' या कवितेमध्ये ज्या मातीतून जगाची उत्पत्ती होते. तीच माती जगाच्या भरणपोषणाचे कार्य करते. अशा मातीत बळिराजा बीज पेरतो. त्या बीजांच्या अंकुरासाठी पाण्याची

आवश्यकता असते. पण ते पाणीच आभाळात थेंबभरसुद्धा शिल्लक नाही.

**आभाळात नाही**
**थेंबभर पाणी**
**कोरडी कहाणी**
**मातीसाठी** (पृ. ७)

मातीतून मोती पिकविण्यासाठी बळिराजाने केलेले कष्ट पाण्याअभावी पावसाअभावी वाया जाते. तेव्हा बळिराजा आपल्या कर्तृत्वाला 'कोरडी कहाणी' समजतो. बळिराजाचे जीवन आभाळ अन् मातीशी किती व्यापून राहिले आहे, भरून राहिले आहे. याची प्रचिती वरील विवेचनातून येते.

### ६.३ समाजाचा उदरनिर्वाह चालविणारा काबाडाचा धनी :-

बळिराजा आपल्या शिवारात ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता अहोरात्र कष्ट करीत असतो. आणि इथल्या समाजाची रोजीरोटी पूर्ण करत असतो. म्हणूनच शेती आणि शेतकरी हा भारतीय जीवनाचा आत्मा आहे असे म्हटले जाते. समाजाचा उदरनिर्वाह चालविणारा हा काबाडाचा धनी कवी भगवान ठगांनी 'शेती', 'मातीलाही', 'गेला हो निघून' या कवितेतून रेखाटला आहे.

'शेती' या कवितेमध्ये बळिराजा शेतात आयुष्यभर राबतो. त्याच्या राबण्याला ना अंत ना शेवट असतो. त्याचे राबणं अखंड सुरू असते. शेत, गुरंढोरं, नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी अशी एक नाही तर असंख्य कामे त्याला करावी लागतात. या कामातून त्याला जेवणासाठीसुद्धा वेळ नसतो इतके कष्ट त्याच्यासमोर पडलेले असतात.

**झाली रानभर**
**आयुष्याची ओवी**
**आभाळाला यावी**
**कृष्णकळा** (पृ. ९)

असे हे बळिराजाचे कष्ट रानभर पसरलेल्या ओवीसारखे आहे. अशा वर्णनामधून कवी समाजासाठी राबणाऱ्या बळिराजाच्या कष्टाचे स्वरूप विशद करतो.

'मातीलाही' या कवितेमध्ये बळिराजाचा उदारपणा प्रकट केला आहे. 'सूर्य' हा प्रकाशाचे प्रतीक आहे. सूर्य हा सर्व शक्तीमान आहे. असा सूर्य संपूर्ण विश्वाला प्रकाश देतो, तो कधी भेदभाव

करीत नाही, गरीब-श्रीमंत कधी म्हणत नाही अगदी तसेच कार्य बळिराजा करतो. बळिराजा शेतात अहोरात्र घाम गाळून भाकरी पिकवितो आणि साऱ्या विश्वाची भूक भागवितो. बळिराजाही कधी भेदभाव करीत नाही. सूर्य जसा उदारमनाने स्वत: जळत राहतो. आणि इतरांना प्रकाश देतो. अगदी तसेच बळिराजा स्वत: शेतात कष्ट करतो आणि जगाचे भरणपोषण करतो. हा उदारपणा जसा सूर्याकडे आहे तसाच बळिराजाकडे आहे.

**निर्माण करतो**
**सूर्याची आकृती**
**छोट्या छोट्या वाती**
**विश्वभर** (पृ. १५)

असा हा उदारमनाचाबळिराजा संपूर्ण विश्वात छोट्या छोट्या वातीसारखा विखुरलेला आहे. असे कवी ठग प्रतीत करतात. हा काबाडाचा धनी बाराही महिने आपले कर्म न चुकता पार पाडीत राहतो आणि त्यातच धन्यता मानतो.

## ६.४ अविरत कष्ट करणारा बळिराजा :-

बळिराजा आपल्या शिवारात प्रामाणिकपणे कष्ट करीत असतो. कष्ट करून आयुष्याची माती झाली तरी त्याच्या पदरात सुख, समाधान पडत नाही कारण निसर्गाची अवकृपा, निसर्गाचा लहरीपणा, दुष्काळ, व्यवस्था, व्यापारी, सावकार इ. अनेक घटक त्याच्या सुखातील अडथळे आहेत. म्हणूनच कुठल्याही सुखाची अपेक्षा न करता अविरत श्रम करणारा गरीब, अर्धपोटी, शेतकरी कवी भगवान ठग यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. अविरतपणे श्रम करणाऱ्या बळीराजाचे चित्र कवी भगवान ठग यांनी 'दैवावर भार', 'भाकरीच्या आत' आणि 'चौकटीच्या आत' इ. कवितांमधून चित्रीत केले आहे.

'देवावर भार' या कवितेमध्ये बळिराजा पेरणीच्या अगोदरपासून ते पीक हातात येईपर्यंत त्या मातीत सतत राबत असतो. शिवारातील पीक उभं राहण्यासाठी त्याच्या हाडाची काडं होतात. हात थरथर कापतात, एवढे कष्ट करूनही उभे केलेले पीक पदरात पडेल की नाही याची शाश्वती त्याला देता येत नाही.

**बीज उभारतो**
**थरारतो हात**
**आणि वाताहात**
**ओठांवर** (पृ. १७)

बळिराजाच्या मनाची झालेली द्विधावस्था कवी प्रस्तुत पद्य पंक्तीतून चित्रीत करतात.

'चौकटीच्या आत' या कवितेमध्ये बळिराजा काहीतरी पसा कुडता आपल्या पदरात पडेल या आशेनेच मातीत 'बी' पेरत असतो. मातीत 'बी' पेरल्यानंतर त्याच्या आशेचा दुसरा टप्पा सुरू होतो. तो म्हणजे मातीतून वर येणाऱ्या कोंबाची आतुरतेने वाट पाहणे.

**केव्हा हे येतील**
**मातीच्या आतून**
**देतील साधून**
**देह मूल्य** (पृ. ३९)

जेव्हा मातीतून कोंब तरारून वर येतील तेव्हाच शिवारात झिजवलेल्या देहाला देहमूल्य प्राप्त होईल. आपल्या कष्टाला मूल्य प्राप्त व्हावे म्हणून त्याचे सारं लक्ष त्या मातीतून तरारून येणाऱ्या कोंबाकडे केंद्रीत झाले आहे. आनंद यादव म्हणतात - "ग्रामीण जीवनाचा आत्मा असलेली शेती आणि ती कसणारा शेतकरी हाच ग्रामीण साहित्याचा आत्मा असतो."[५] असा हा अविरत श्रम करणारा बळिराजा ग्रामीण साहित्याचा आत्मा बनून राहिला आहे.

## ६.५ काळी माती साता जन्माची आई :-

काळ्या मातीचा टिळा कपाळी लावून बळिराजा आपल्या साता जन्माच्या आईची निस्वार्थपणे भक्ती करीत असतो. उदरभरण करणारी काळी आई आणि जन्म देणारी आई यांचे मोल प्रत्येक माणसांच्या आयुष्यात महत्त्वाचे असते. अशा काळ्या आईची महानता आणि महत्त्व कवी भगवान ठगांनी 'ओशाळती माती', 'जन्म', 'आत्मद्रोह', 'पाखरं भुलले', 'मातीसाठी स्नेह', 'दु:खाचा विवाद' इ. कवितांमधून प्रकट केले आहे.

'पाखरं भुलले' या कवितेमध्ये भारतीय संस्कृतीत मातीला माता म्हटले जाते. ही माता एकट्या बळिराजाची नसते तर तुमची आमची सर्वांचीच ती माता असते. म्हणून या विश्वातला प्रत्येक माणूस हा शेतकरी असतो. परंतु कामामुळे, व्यवसायामुळे तो वेगवेगळ्या क्षेत्रांत विभागला गेलेला आहे. म्हणून शेती कसणारा, माती कसणारा तो शेतकरीच या मातीच्या हृदयात बीज पेरतो आणि त्याची काळजी वाहतो.

**तुमच्या मातीत**

**आमच्या मातीत**

**आणि आतड्यात**

**प्राणबीज** (पृ. २१)

मातीच्या हृदयातील बीज हा जसा मातीचा प्राण असतो तसाच तो शेतकऱ्याचाही असतो असे कवी ठग वरील पद्यपंक्तीतून प्रतीत करतात.

'जन्म' या कवितेमध्ये, काळ्या आईला ईश्वरासमान मानून तिची भक्ती करणारा बळिवंत काळ्या आईची तुलना युगे अठ्ठावीस विटेवर उभा असणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाशी करतो. काळ्या मातीचा रंग आणि विठ्ठलाच्या रूपाचा रंग सारखाच आहे. अशा ईश्वररूप असलेल्या काळ्या आईचे बळिराजा अपत्य आहे.

**विठ्ठल रूपाची**

**माझी काळी माती**

**आहे तिच्या हाती**

**शेतकरी** (पृ. १४)

असा हा बळिराजा रात्रंदिवस, उन्हापावसात कष्टाच्या माध्यमातून तिची सेवा, भक्ती करत असतो.

'मातीसाठी स्नेह' या कवितेमध्ये माती जन्म देणारी, माती जगविणारी, माती वाढविणारी, माती पोटात घेणारी अशी मातीची अनेक रूपे आहेत. अशा मातीत बळिराजा जन्माला येतो आणि तिची सेवा करत करत तिच्यासारखा होण्यासाठी आपला देह आयुष्यभर मातीत जाळीत राहतो. कारण बळिराजावर मातीचे अनंत उपकार असतात. त्या उपकाराची फेड करण्यासाठी त्याला मातीसम व्हावे लागते. म्हणूनच तो आपला देह त्या मातीत रात्रंदिवस जाळीत असतो.

**माती आणि माती**

**तिच्यासम होणे**

**देहास जाळणे**

**क्षणभर** (पृ. ४९)

अशाप्रकारे कवी ठग बळिराजाचे मातीवरील प्रेम प्रकट करतात.

'जन्म' या कवितेमध्ये काळ्या आईची निष्ठेने केलेली भक्ती बळिराजाला बहरलेल्या पिकांतून दिसते. वावरात बहरलेलं पीक त्याच्या नजरेला पडलं की त्याचं भान हरपून जाते, त्याच्या मनात आनंदाचे आभाळ निर्माण होते.

**भक्तीरूप पीक**
**असे बहरले**
**भान हरपले**
**रचनेचे** (पृ. १४)

आपण केलेल्या कष्टाला, मातीत गाळलेल्या घामाला, काळ्या आईने मोल दिले म्हणूनच तो तिला साता जन्माची आई म्हणतो.

## ६.६ बळिराजाचे दुःख आणि वेदना :-

आज पर्यावरणाचा तोल ढासळल्यामुळे वेळेवर येणारा पाऊस अनियमित झाला. शेतकऱ्याच्या विहिरी कोरड्या पडल्या. सेंद्रिय खताच्या अतिरेकाने जमिनी नापीक झाल्या. त्याचा परिणाम शेतकरी जीवनावर झाला. बळिराजाने जीवनभर त्या शिवारात राबावे आणि तरीही दुःखच त्याच्या वाट्याला यावे हेच त्याच्या नशिबी आहे. ही खंत कवी भगवान ठगांनी आपल्या समग्र कवितेतून व्यक्त केली आहे. बळिराजाचे हे ठसठसणारं दुःख आणि सलणारी वेदना 'भूमीस्वामी', 'आयुष्याचा', 'जीवनाची शीव', 'थोपवू मी कशा', 'मीच कास्तकार', 'वाट नागमोडी' इ. कवितांमधून धारदारपणे व्यक्त झाली आहे.

'भूमीस्वामी' या कवितेमध्ये पाऊस कुण्या गावाला गेला, कुठे दडून बसला. याचा पत्ता नावालाही बळिराजाजवळ नसतो. पण हजारो वर्षापासून विश्वाला प्रकाश देणाऱ्या सूर्याच्या प्रखर उष्णतेने शिवारातील कोवळे कोंब निर्जीव होतात तेव्हा.

**झाले अचेतन**
**मुके मुके कोंब**
**प्रकाशाचे स्तंभ**
**सनातन** (पृ. १६)

अशावेळी बळिराजाच्या दुःखाला परिसीमाच राहात नाही.

'महापूर' या कवितेमध्ये बळिराजाच्या आशेचे जे जे उगम आहेत. ते सगळेच नदीच्या कोरड्या पात्रासारखे कोरडेच आहेत. निसर्ग, पर्यावरण, शासन, ऋतु, बाजारपेठ ही बळिराजाच्या आशेची उगमस्थाने आहेत. पण ही सगळीच उगमस्थाने जेव्हा कोरडी पडतात. तेव्हा बळिराजाच्या मनामध्ये, हृदयामध्ये वेदनेच्या कळा दाटून येतात.

**अवघे उगम**
**झालेत कोरडे**
**मनातच अडे**
**आत्मकळ** (पृ. २१)

बळिराजाला वेदनेच्या कळा मनातून व्यक्त करता येत नाही कारण व्यक्त करून आपल्या वाट्याला कोरडेपणाच येणार हे तो जाणून आहे.

'जीवनाची शीव' या कवितेमध्ये मातीत भाकरी पिकविणे हा बळिराजाचा युगधर्म नसून मातीत वेदना पिकविणे आणि तीच जगणे हा इथल्या बळिराजाचा युगधर्म ठरतो. बळिराजाच्या वाट्याला मातीत राबूनही जेव्हा वेदनाच पदरात पडते तेव्हा त्याचे अवघे आयुष्य उजाड माळासारखे भकास बनून जाते.

**उजाड भकास**
**आयुष्याचे होणे**
**वेदनेत जीणे**
**आज येथे** (पृ. ३३)

'थोपवू मी कशा' या कवितेमध्ये शेतात राबताना बळिराजाचा उत्साह दांडगा असतो पण राबणाऱ्या उत्साही हातात जेव्हा काहीच पडत नाही तेव्हा त्याच्या जीवाला कापरे सुटते. मातीत राबून राबून बळिराजाचा जीव थकून जातो, शरीर उतारवयाला लागते. अशावेळी बळिराजाचे आणि मातीचे, त्याला शेताकडे घेऊन जाणाऱ्या रस्त्याचे नातं संपुष्टात येतं अशावेळी बळिराजाचं दु:ख इतकं अनावर होतं की त्याला सीमाच राहत नाही.

**निसटली आज**
**माती हातातून**
**आणि पायातून**
**रस्तेसुद्धा** (पृ. ४१)

'कळ' या कवितेमध्ये पेरणी झाली की शेतकऱ्याचे डोळे त्या आभाळाकडे लागलेले असतात. डोळे थकले, भिजले तरी त्याचे वाट पाहणे थांबत नाही. एवढी वाट पाहूनही जेव्हा तो कोसळत नाही तेव्हा त्याच्या काळजातील कळा त्याला मरणकळा आणतात.

**निराधार झाले**

**मनाचे आभाळ**

**काळजात कळ**

**जन्मजात** (पृ.१२)

बळिराजा जिवंत असूनही त्याला मरण अनुभवावं लागतं हे इथल्या बळिराजाचं अंतिम दुःख आहे. कवी ठग म्हणतात की बळिराजाचे दुःख हे आजचे नाही तर ते जन्मजात त्याच्या वाट्याला आले आहे. बळिराजाचे दुःख जसे मातीत न पिकणाऱ्या भाकरीविषयीचं आहे. तसेच मातीपासून आपण तुटत चालल्याचेही आहे.

### ६.७ वैफल्यग्रस्त अन्नदाता :-

शेतकरी जीवन हे पावसावर, निसर्गावर आणि पर्यायाने नक्षत्राच्या औदार्यावर अवलंबून असते. पंचागात पावसाची म्हणून बारा नक्षत्रे निश्चित केलेली आहेत. मृग, आर्द्रा, रोहिणी, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती इ. नक्षत्रे जर कोरडीच गेली तर बळीराजाचे जीवन उद्‌ध्वस्थ, वैफल्यग्रस्त बनते. कवी भगवान ठग यांनी आपल्या 'बीजांच्या संगती', 'संधिकाळ', 'जीवनाची शीव', 'आयुष्य आंबलं' इ. कवितांमधून वैफल्यग्रस्त अन्नदात्याचे चित्र रेखाटले आहे.

'संधिकाळ' या कवितेमध्ये बळिराजा रात्रंदिवस ऊन, वारा, पाऊस न म्हणता आपल्या कष्टाचे दिवे रानात पेटवित असतो. पण हे कष्टाचे दिवे निसर्गाच्या अवकृपेमुळे विझू लागतात. तेव्हा त्याच्या वाट्याला नुसती राख येते.

**विझता विझता**

**राख हाती आली**

**काळजाला झाली**

**आत्मपीडा**

अशी ही स्वतःची आत्मवंचना स्वतःच्याच डोळ्यांनी त्या बळिराजाला पाहावी लागते. तेव्हा 'आपुले मरण पाहिले म्या डोळा, जाला अनुपम सोहळा' या तुकारामांच्या अभंगाची आठवण होते.

'जीवनाची शीव' या कवितेमध्ये बळिराजाला अनेक प्रश्न सतावतात. त्यापैकी आपल्या वंशाला दिवा मिळावा, जीवनात वंश वाढावा, आणि त्याचा वेलू गगनावर चढावा अशी त्याची मनोमन इच्छा असते. पण जेव्हा बळिराजाच्या वंशाला दिवा मिळत नाही तेव्हा त्याचा जीव लाही लाहीसारखा होतो.

**वंशाची काळजी**
**जीव लाही लाही**
**हाती नाही काही**
**माणसाच्या** (पृ. ३३)

वंशपरंपरेने चालत आलेली शेती करण्यासाठी बळिराजाच्या वंशाला दिवा मिळत नाही तेव्हा त्याच्या आयुष्यात निराशेचे ढीग साठतात.

'आयुष्य आंबलं' या कवितेमध्ये बळिराजा आपल्या उरात अनंत स्वप्नं घेऊन रात्रंदिवस कष्ट करीत असतो. आपली स्वप्ने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तो शरीराला थकू देत नाही. डोळ्यावर पिंगा घालेणारी झोप धुडकावून लावतो. शेवटी शरीर थकतं, डोळे शिणतात पण बळिराजाचं रान ओलं होत नाही. ते शेवटपर्यंत वाळलंच राहतं असे हे निराशेचे काळेकुट्ट ढग बळिराजाच्या जीवनातून पुढे सरकतच नाहीत.

**डोळ्यातील रान**
**वाळलं वाळलं**
**आयुष्य आंबलं**
**माणसाचं** (पृ. ४८)

आयुष्य आंबलं, संपत आलं तरी जीवनातील निराशा संपत नाही.

## ६.८ बळिराजाचे अर्थहीन कष्ट व सोशिक जीवन :-

बळिराजा आपल्या शिवारात कष्ट करतो पण त्या कष्टाला योग्य दाम मिळावा म्हणून प्रयत्न करीत नाही. म्हणूनच त्याचे कष्ट अर्थहीन ठरते. गाळलेल्या घामाला मोल न मिळाल्यामुळे बळिराजाच्या जीवनात अनंत अडचणी निर्माण होतात. त्या अडचणीतून दु:ख वाट्याला येते. आणि हे दु:ख कोणतीही तक्रार न करता तो सोशिकपणे जगत राहतो. कवी भगवान ठग यांनी त्याचे अर्थहीन कष्ट 'उब', 'मीच कास्तकार', 'दु:खाचा विवाद' इ. कवितेतून चित्रबद्ध केले आहे.

'उब' या कवितेत बळिराजा आपलं दु:ख हृदयात कोंडून ठेवतो, त्याला जपून ठेवतो. पण आपल्या वाट्याला आलेल्या दु:खाचा कधीही आक्रोश करीत नाही की, बोभाटा करीत नाही. ही बळिराजाची सोशिकवृत्ती बघून त्याच्या शरीरातील रक्तसुद्धा बावरून जाते.

**खुपणारे दु:ख**

**हृदयात जपले**

**रक्त बावरले**

**शरीरात** (पृ. ४७)

'मीच कास्तकार' या कवितेमध्ये परंपरेने चालत आलेला शेती व्यवसाय असाच पुढे वर्षानुवर्षे चालत राहावा म्हणून बळिराजा शेतीने कितीही तोटा पदरात टाकला तरी पुढच्या पसलीत मागचा तोटा भरून निघेल या आशेने मन ओतून शेतीत काम करीत असतो. पण फसल (पसल) वाया जाते अन् बळिराजाचा जीव व्याकूळ होतो. अशा व्याकूळ अवस्थेत तो बँकांचे, सावकारांचे दारे ठोठावतो. बँका, सावकाराकडून घेतलेले कर्ज काही शेतात, काही पोराबाळांच्या लग्नात, काही घरात खर्चून टाकतो. येणाऱ्या पसलीत नुसतं सावकाराचं व्याजही परत फिरविता येत नाही. अशावेळी त्याच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढत जातो.

**आभाळाला भेगा**

**पडल्या हो आज**

**वाढते हे व्याज**

**डोक्यावर** (पृ. ५६)

बळिराजाचे जीवन कर्जाच्या ओझ्यामुळे अर्थशून्य होतं. अशाही अवस्थेत तो आपली सोशिक वृत्ती कायम ठेवतो. बळिराजा ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करत नाही किंवा संघर्षही करत नाही.

## ६.९ पाऊस हाच परमेश्वर :-

बळिराजाचे सर्वच जीवन पावसावर अवलंबून असते. पाऊस हाच त्याचा देव असतो. पावसाशिवाय त्याचं आयुष्य म्हणजे वैराण वाळवंट असते. म्हणून त्या पावसाची तो चातकासारखी वाट पाहतो. बळिराजाच्या जीवनातील सुख आणि दु:ख हा पाऊसच ठरवितो. म्हणूनच तो पावसाला परमेश्वर मानतो. आनंद यादव म्हणतात - ''ढग येतात गरजून निघून जातात. ढगांशिवायचे आकाश कुंकू पुसलेल्या कपाळासारखे वाटू लागते. आभाळाला लागलेले डोळे सुतक पडल्यासारखे त्रासून

जातात.''[६] इतक्या केविलवाणी त्या पावसाची बळिराजा वाट पाहत असतो. बळिराजाच्या बाबतीत परमेश्वर ठरलेल्या पावसाचे चित्र कवी भगवान ठगांनी 'रक्तफुले', 'गेला हो निघून' इ. कवितेतून रेखाटले आहे.

'रक्तफुले' या कवितेमध्ये मानवाच्या दुष्कृत्यामुळे काळंनिळं आभाळ कोरडं रूप धारण करते. त्यामुळे मातीचं मातीपण संपुष्टात येतं, मातीवर कोरडे शेवाळे चढते. पाऊस देणाऱ्या आभाळात चंद्रफुले येण्याऐवजी रक्तफुले येतात, आकाशात मेघ भरून येण्याऐवजी विरून जातात.

**शेवाळली माती**
**खोल खोल गेली**
**आकाशाला आली**
**रक्त फुले** (पृ. २२)

कवी भगवान ठग आकाशाला रक्त फुले आली असे ठामपणे सांगतात.

'गेला हो निघून' या कवितेमध्ये 'पाऊस'बळिराजाला परमेश्वरासमान वाटत असतो. कारण तोच बळिराजाचं भलंबुरं ठरवित असतो. बळिराजा आपल्या कष्टाच्या वाती त्या मातीत पेटवितो पण पाऊसच जेव्हा रजा घेतो, निघून जातो, तेव्हा कष्टाच्या वातीतून पडलेल्या स्वप्नांचा चुरगाळा होतो. भविष्य अंधारमय होऊन जाते. जेव्हा पाऊस निघून जातो.

**वाती भडकल्या**
**रडतो उजेड**
**स्वप्न झाले जड**
**भविष्याचे** (पृ. ३३)

बळिराजाच्या जीवनात पाऊस किती महत्त्वाचा असतो याची प्रचिती प्रस्तुत कवितेतून येते.

### ६.१० बळिराजाच्या दुस्थितीला जबाबदार घटक :- व्यवस्था, प्रारब्ध, निसर्ग :-

बळिराजाच्या दुस्थितीला व्यवस्था, प्रारब्ध आणि निसर्गच जबाबदार आहे असे कवी भगवान ठग आपल्या 'बळी', 'ओशाळते माती', 'आयुष्य जाळतो', 'काया', 'मातीमध्ये', 'आज्ञा', 'आयुष्याचा', 'मृत्यूबीज', 'जीवनाची शीव', 'नांगर मोडले', 'मीच कास्तकार' इ. कवितांमधून प्रकट करतात.

'बळी' या कवितेमध्ये 'बळिराजा' सावकाराकडून कर्ज काढतो आणि शेतीत पेरणी करतो. शेतात चांगले उत्पादन आले की, सावकाराचे कर्ज फेडून टाकू अशी आशा त्याला असते. या आशेवर व्यापारी, दलाल पाणी सोडतात. शेतात सोन्यासारखा माल पिकूनही त्याला व्यापारी योग्य मोबदला देत नाहीत. (बळिराजाच्या मालाची आवक वाढली की व्यापारी किंमती कमी करतात आणि आवक कमी झाली, की मालाच्या किंमती भरमसाठ वाढवतात. हे व्यापाऱ्याचे धोरण) मिळालेल्या पैशातून सावकाराचे कर्ज तर फिटत नाहीच पण पोराबाळाला कपडे आणण्यासाठी, सणावाराला गोडाधोडाचे करण्यासाठीही त्याच्याकडे पैसे उरत नाहीत. इतकी वाईट अवस्था त्याच्या वाट्याला येते. इथल्या व्यवस्थेकडून होणारी त्याची लूट त्याच्या आत्महत्येला कारणीभूत आहे. असे कवी म्हणतात,

**आत्महत्येसाठी**
**डाव रचतात**
**त्यात फसतात**
**कास्तकार** (पृ. १०)०००

'आयुष्य जाळतो' या कवितेमध्ये जगाच्या पोशिंद्याचा जन्म अंधारातच होतो आणि संपूर्ण आयुष्यही त्याला या अंधारातच काढावे लागते. कारण प्रकाशात येण्याचे भाग्य नियतीने त्याच्या पदरात टाकले नाही. बळिराजा जन्मल्यापासून रानात जनावरासारखा राबत असतो. काळ्या आईची सेवा करणे हे जसे त्याचे कर्तव्य आहे. तसेच कुटुंबाची देखभाल करणे हेही त्याचे कर्तव्य आहे.ह्या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडताना त्याला अनेक संकटे येतात. त्या निसर्गाची अवकृपा, बी-बियाण्याच्या वाढत्या किंमती, शेतीमालाला न मिळणारा योग्य भाव, कर्जासाठी पुढाऱ्यांचे पाय धरणे, सावकाराला खरेदी खत लिहून देणे, अशात घरातील पोरी लग्नाला येतात. पोरी म्हणजे शेतकऱ्याच्या झोळीत पडलेला एक जळता निखारा असतो. पोरीची जोपर्यंत लग्न होत नाहीत तोपर्यंत त्याच्या जीवाला घोर असतो. शेतीची आबाळ झाली तरी चालेल, पण पोरीचे लग्न आधी झाले पाहिजे. या काळजीने तो सतत वेढलेला असतो. अशा परिस्थितीत काळी आई त्याला कधीच साथ देत नाही, तेव्हा वेदनेचे कढ सोशीत राहणे एवढेच त्याच्या हाती राहते.

**तमातून येतो**
**तमातच जातो**
**आयुष्य जाळतो**
**उरीपोटी** (पृ. १५)

असा हा जगाचा पोशिंदा अंधारातच या जगात प्रवेश करतो. अन् अंधारातूनच या जगातून निघून जातो. याला केवळ त्याचे दैव प्रारब्ध कारणीभूत आहे.

'आयुष्याचा' या कवितेमध्ये बळिराजाचे दु:ख तो ज्या मातीत राबतो त्या मातीत उगवत नाही तर बळिराजाच्या दु:खाचे मुळ कारण त्याचे प्रारब्ध होय. बळिराजाचे प्रारब्ध फुटके निघाले, त्यामुळे त्याच्या आयुष्याची माती झाली, दैवाचे भोग भोगता भोगता पाय भेगाळले, जीव कुडीत उरला, आयुष्याचा शेवट जवळ आला तरीही नशीब फळफळत नाही कारण प्रारब्धाची माती केव्हाच झाली आहे.

**प्रारब्धाची माती**
**पाय भेगाळले**
**टिंबात उरले**
**आयुष्य** (पृ. २८)

'आज्ञा' या कवितेमध्ये आज सरकारी व्यवस्था बळिराजासाठी जे जे निर्णय घेते, योजना आखते, त्या सगळ्या खोट्या ठरतात. त्यांनी मांडलेले आतापर्यंतचे सगळे सिद्धांत, सगळी आश्वासने कागदावरच राहतात. म्हणून शासन हे विश्वासघातकी आहे असा बळिराजा समज होतो.

**सारे तपशील**
**वेंधळे वेंधळे**
**सिद्धांत सगळे**
**दगाबाज** (पृ. २४)

बळिराजाचा शासन व्यवस्थेवरील उडालेला विश्वास प्रस्तुत पद्यपंक्तीतून व्यक्त झाला आहे.

'जीवनाची शीव' या कवितेमध्ये आज वातावरणात बदल झाल्यामुळे ऋतू चक्र बदलले आहे आणि फुलांच्या (पिकांच्या) नशिबी रडणे आले. बळिराजाच्या दु:खांचे एक नाही तर अनेक धनी आहेत. त्यामध्ये निसर्ग, व्यापारी, सावकार, शासनव्यवस्था इ. चा समावेश होतो. या दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी बळिराजाचे जीवन अंध:कारमय, भकास आणि उदास केले आहे. अशी कवीची ठाम समजूत आहे.

**फुलाचे रडणे**
**ऋतु बावरणे**
**नाठाळाचे येणे**
**आयुष्यात** (पृ. ३३)

'मीच कास्तकार' या कवितेत बळिराजा परिस्थितीपुढे पराभूत होतो तेव्हा त्याच्यापुढे एकच पर्याय असतो. तो म्हणजे आत्महत्या. बळिराजाच्या जीवनात जी दयनीय परिस्थिती ओढवली त्याचा निर्माता परमेश्वर आहे याची खात्री बळिराजाला आहे. म्हणूनच न संपणाऱ्या दु:खातून मुक्त होण्यासाठी तो आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो आणि आपल्या दु:खाला त्याच्या परीने तो संपवितो.

**काय करू आता**

**करू आत्महत्या**

**अरे हे निर्मात्या**

**तुझ्यापायी** (पृ. ५६)

बळिराजाने आत्महत्येचाच मार्ग का पत्करला, दुसरा मार्ग का पत्करला नाही ? या प्रश्नाचा शोध घेतला तर आत्महत्या हा दु:खाला पर्याय नाही, तरीपण तो आत्महत्येचा मार्ग पत्करतो याचा अर्थ तो अज्ञान आहे अशातला भाग नाही पण दु:खी जीवन जगण्यापेक्षा मेलेले बरं या एकाच विचाराने त्याने आत्महत्येचा मार्ग पत्करलेला असावा असे वाटते.

## ६.११ निसर्गसंहार :-

आज एकविसाव्या शतकात माहिती तंत्रज्ञानामुळे सारे जग माणसाजवळ आले. परंतु माणूस माणसांपासून दूर चालला. बदलत्या परिस्थितीनुसार माणसांच्या गरजा आणि गरजांचे स्वरूप बदलले. आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी माणसांनी विवेकाला दूर सारून भावनेला जवळ केले, भावना प्रधान झालेल्या माणसाने आपल्या इच्छापूर्तीसाठी निसर्गाचा संहार करायला सुरूवात केली. त्याचा वातावरणावर, ऋतुमानावर, पर्यायाने मानवी जीवनावर वाईट परिणाम झाला. आज बदललेले ऋतुचक्र, पृथ्वीवरचे वाढत चाललेले तापमान, वर्षानुवर्ष पडत चाललेले दुष्काळ हे मानवाने केलेल्या निसर्गसंहाराचेच परिणाम आहेत. असे कवी भगवान ठग यांनी 'विद्रुप नीती', 'रक्त फुले', 'संवादी', 'नदी' इ. कवितांतून व्यक्त केले आहे.

'विद्रपु नीती' या कवितेमध्ये माणूस स्वत:ला निसर्गापेक्षा श्रेष्ठ मानतो आणि या श्रेष्ठपणात तो पृथ्वीची नासधूस करतो. पृथ्वीच्या विनाशामुळे आज पर्यावरणाचा समतोल बिघडला त्याचा परिणाम शेती, पाणी, जीवन आणि अर्थव्यवस्था या घटकांवर झाला. ज्या मानवाने पृथ्वीच्या चिंध्या चिंध्या केल्या, पृथ्वीला अनंत वेदना दिल्या तोच माणूस आज माणसांचा संहार करायला घाबरत नाही. मानवाच्या मनोविकृतीमुळे आज जागोजागी रक्ताचे सडे पडलेले दिसून येतात.

**वेदनांच्या खुणा**

**पृथ्वीचे वाभाडे**

**रक्ताचे हे सडे**

**जागोजागी** (पृ. १८)

पर्यावरणाचा जो समतोल बिघडला त्याला माणसाची नीती, वृत्ती कारणीभूत आहे हे स्पष्ट होते.

'रक्तफुले' या कवितेत आज मानवाच्या इच्छा, आकांक्षा दिवसेंदिवस वाढत आहे. क्षणिक सुखाच्या पाठीमागे लागलेला माणूस आपल्या इच्छेआड येणाऱ्या गोष्टीचा तो क्षणांत संहार करतो. या मानवाच्या इच्छेपोटीच आज निसर्गाचा संहार होत आहे. त्यामुळे आज पहिल्यासारखा पाऊस पडत नाही. रानामाळातून पावसाच्या पाण्याचे ओहळ दिसत नाहीत. याला केवळ माणूस आणि माणसांची वासना कारणीभूत आहे.

**दृष्टीला चकवा**

**असाच लागला**

**वासनेला आला**

**महापूर** (पृ. २२)

आज तर माणसांच्या वासनेला महापूरच आला आहे असे कवी ठग सांगतात.

## ६.१२ बळिराजा जवाएवढ्या सुखाचा धनी :-

बळिराजा आशेवर जगणारा प्राणी आहे. मग ती आशा कितीही निराधार असो, बळिराजा स्वप्नांवर जगणारा प्राणी आहे. मग ती स्वप्ने कितीही असंभवनीय असली तरी चालतील. ही बळीवंताची प्रकृतीच बळिवंताला जगण्यास बळ देते. बळिराजाच्या जीवनात आलेले सुख किती अल्प आहे हे कवी भगवान ठग आपल्या 'शिवार', 'रक्त', 'ऊब' या कवितेतून चित्रीत करतात.

'शिवार' या कवितेतून 'शेती' हा फार पूर्वीपासून चालत आलेला पिढीजात व्यवसाय प्राचीन काळी श्रेष्ठ मानला जात असे. शिवारात आयुष्याची माती झाली तरीही बळिराजा त्या मातीला सोडीत नाही, काळी आई आज ना उद्या पिकेल, आपले दैव कधी तरी उजळेल या आशेवर तो शिवारात राबत असतो. एक दिवस शेतकऱ्याचे दैव उजळते, घरात धान्याच्या राशी भरून येतात तेव्हा त्याचा आनंद गगनात मावत नाही. अशावेळी त्याची अवस्था पालखीच्या भोयाप्रमाणे होते.

**पिढीजात दैव**

**आज उजळले**

**भोई बावरले**

**पालखीचे** (पृ. ८)

बळिराजाचे हे सुख त्याला शाश्वत आनंद मिळवून देत नाही म्हणूनच त्याचे सुख जवाएवढे (जवसाएवढे) आहे.

'उब' या कवितेत बळिराजाची सोशिकवृत्ती, संयमी वृत्ती पाहून नियतीला दया येते. आणि बळिराजाच्या आयुष्यात शेवटी शेवटी सुखाचे कारंजे उडतात. या जवाएवढ्या सुखाने बळिराजाच्या मावळत चाललेल्या आयुष्याला एक नवी उब येते आणि बळिराजाचे आयुष्य शेवटी सुखी समाधानी होते.

**मावळत होतो**

**तेव्हा तुझे येणे**

**आणि उब देणे**

**मूलभूत** (पृ. ४७)

प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, समाधान, आनंद संचारत असतो. अगदी तसेच बळिराजाच्याही आयुष्यात शेवटी सुख समाधान संचारले आहे. हा नियतीचाच मूलभूत नियम आहे. असे कवी भगवान ठग प्रस्तुत पद्यपंक्तीतून प्रकट करतात.

## ७. 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध :-

साहित्यक्षेत्रातील कोणत्याही कलाकृतीत तिच्या घाटाला फार महत्त्व असते. इंग्रजीतील 'फॉर्म' या शब्दावरून आपल्या साहित्यसमीक्षेत 'घाट' हा शब्द रूढ झाला आहे. हा घाट कलाकृतीच्या आंतरबाह्य संघटनांनी बांधलेला असतो. कलावंताला जो अनुभव येतो तो वाचकांपुढे विशिष्ट प्रकारच्या कला माध्यमातून साकार होत असतो. घाटाचे आंतरघाट व बाह्यघाट असे दोन प्रकार आहेत. ''बाह्य घाट शब्द, अलंकार, वृत्त व एकंदर कलाकृतीची रचना यातून साकार होतो. तर आंतरघाट हा भावानुसारी विविध स्पंदने घेऊन इंद्रिय होतो.''[७] अशा या घाटाला साहित्यक्षेत्रात विशेष महत्त्व आहे.

कवी भगवान ठग यांचा 'अन्नदात्याची धुळाक्षरे' या कविता संग्रहातून कोणता आकृतिबंध अविष्कृत झाला आहे आणि तो कशा पद्धतीने अभिव्यक्त झाला आहे. याचे विवेचन महत्त्वाचे ठरणार आहे.

## ७.१ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध : बळिराजाचा जीवनानुभव व्यक्त करणारा :-

कवी भगवान ठग यांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' या कवितासंग्रहातून कृषिसंस्कृती आणि कृषिसंस्कृतीशी निगडीत असलेला प्रमुख घटक बळिराजा व त्याचा जीवनानुभव अभंग आकृतिबंधातून व्यक्त केला आहे. कवी ठगांनी बळिराजाचा जीवनानुभव व्यक्त करताना त्याच्या दु:खाची चर्चा, दु:खाची खोली तपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न या आकृतिबंधातून केला आहे. 'मृत्यू बीज' या कवितेमध्ये बळिराजाच्या दु:खाची खोली इतकी खोल आहे, की त्याचा तळ कवी ठगांना सहजासहजी लागत नाही. पण त्याचा शोध घेण्यासाठी त्यांचे कवीमन सतत धडपडत राहते. सरते शेवटी बळिराजाच्या दु:खाचे मूळ त्याच्या जन्मावेळीच त्याच्या देहात उगवलेल्या मृत्यूबीजात आहे. असा शोध लागतो.

**नाही समाधान**
**आसवांच्या आत**
**अवघ्या देहात**
**मृत्यूबीज** (पृ. २९)

कवी भगवान ठगांनी बळिराजाच्या दु:खाचा घेतलेला शोध आणि केलेली मांडणी त्यांच्या ठिकाणी असलेल्या सूक्ष्म प्रतिभेचे दर्शन घडविते.

बळिराजाचे दु:खी जीवन चित्रीत करताना कवी भगवान ठग खूप काळजी घेतात. बळिराजाच्या वाट्याला जरी आयुष्यभर दु:ख आले असले तरी त्याचे जीवन इतरांना दु:खी वाटू नये. उन्हात जरी आपली काया झिजविली असली तरी त्याने भोगलेल्या दु:खाचा इतरांना स्पर्श होऊ नये म्हणून कवी खूप चपखलतेने कवितेची रचना करतात.

**सावलीत माझा**
**जळला हो देह**
**आणि मी विदेह**
**मोक्षासाठी** (पृ. ३२)

प्रस्तुत ओळीतून हे प्रतीत होते की, बळिराजा आपला देह रानात झिजवताना तो उन्हात राबत नाही तर सावलीत राबत आहे. खरं तर तो उन्हातच दिवसभर तळत असतो पण कवीने प्रस्तुत पद्य

15920

पंक्तीतून विरोधाभास दाखवून बळिराजाचे दु:ख झाकून टाकले आहे. हा भगवान ठगांच्या रचनेचा खास पैलू आहे.

तर 'वाट नागमोडी' या कवितेतील 'चांदणे' या दृश्य प्रतिमेतून समाजातील मध्यमवर्ग आणि शेतकरी यांच्यातील भेद स्पष्ट केला आहे. बळिराजाच्या अवतीभोवती सुखाचे चांदणे पसरलेले आहे. या सुखाच्या चांदण्यात आज राजकीय पुढारी, नेते, व्यापारी, सावकार, मध्यमवर्गीय लोक न्हाऊन निघत आहेत. फक्त एकटा बळिराजा या सुखापासून वंचित आहे. ज्या बळिराजाच्या जीवावर मध्यमवर्गीय लोक सुख उपभोगतात त्या बळिराजाची झोपडी आज रडते आहे. याकडे कुणाचेही लक्ष नाही. त्यामुळे आज बळिराजाची झोपडी आणि शिवाराकडे जाणारी त्याची नागमोडी वाट आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

**चांदण्यात माझी**
**रडते झोपडी**
**वाट नागमोडी**
**चेंगरली** (पृ. ५७)

कवी भगवान ठग यांनी 'चांदणे' या दृश्य प्रतिमेतून समाजातील वास्तवतेवर प्रकाश टाकला आहे.

## ६.२ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंध : भावनेपेक्षा विचाराला प्राधान्य देणारा :-

कवी भगवान ठग आपल्या कवितेमध्ये विचाराला अधिक प्राधान्य देतात. खरं तर कवितेमध्ये विचारापेक्षा भावनेला अधिक स्थान असते. परंतु भगवान ठगांच्या कवितेत आपल्याला भावनेपेक्षा विचाराला अधिक प्राधान्य त्यांनी दिलेले दिसून येते. बळिराजाचे अंध:कारमय जीवन व्यक्त करण्यासाठी ते 'ओटी पोटी' या प्रतिमेचा अवलंब करतात.

**ओटी पोटी सारा**
**गच्च अंध:कार**
**दु:खाचा कहर**
**देहदाह** (पृ. ३१)

'ओटी' चा पारंपारिक अर्थ असा की, ज्याची ओटी भरली जाते त्याची ओटी कधीही रिकामी राहत नाही. अगदी तसेच वरील पद्यपंक्तीतून कवी ठग हे प्रतीत करतात की बळिराजाची ओटी

काळ्याकुट्ट अंधाराने भरलेली आहे. हा अंधार बळिराजाच्या ओटीतून कधीही कमी होणार नाही कारण ओटीचा प्रकृती धर्मच तो आहे. असे त्यांना ओटी पोटी या प्रतिमेतून सूचित करावयाचे आहे. भगवान ठगांच्या अशा रचनेतून त्यांचे वैचारिक सामर्थ्य सिद्ध होते.

बळिराजाला आपल्या पिकाची (यशाची) खात्री असते तेव्हा तो बिनधास्त, निर्धास्त असतो. हे चित्रीत करण्यासाठी कवी ठग 'समई' या प्रतिमेचा अवलंब करतात.

**धावतात घोडे**

**क्षितीज काठाने**

**समई तेलाने**

**भरलेली** (पृ. ३१)

'समई' ही प्राचीन संस्कृती सदृश्य प्रतिमा आहे. 'समई' चा प्रकृतिधर्म असा की समई जेव्हा तेलाने पूर्ण भरलेली असते तेव्हा समईतील ज्योतीला विझण्याचा धोका नसतो. तसे शिवारात कोंब तरारून वर आले, की ते मरण्याची भीती बळिराजाला नसते. एका अर्थाने त्याला आपल्या पिकाची खात्री होते. तेव्हाच तो पंढरीचा विठोबा होतो आणि हातात टाळ घेऊन पंढरीच्या दिशेने धावत सुटतो. कवी भगवान ठगांच्या विचाराचे सामर्थ्य त्यांनी स्वीकारलेल्या आकृतिबंधातून ठायी ठायी प्रकट होते.

माणसांच्या जीवनातील दु:ख समूळ नष्ट करणारा गौतम बुद्धांचा धम्म बळिराजाच्या जीवनातील दु:ख कमी करू शकत नाही. कारण बळिराजाचे दु:ख विलक्षण आहे.

**दु:ख वेचणारा**

**बुद्ध कुठे गेला ?**

**शांतीच्या वस्त्राला**

**त्यागोनिया** (पृ. ३५)

कवी भगवान ठग आपल्या रचनेतून गौतम बुद्धांचा धम्म अपूर्ण आहे. त्याला मर्यादा आहे हे सूचित करतात. यावरून त्यांच्या ठिकाणी असलेली अभ्यासूवृत्ती, तटस्थवृत्ती, डोळसता प्रकट होते. कवी भगवान ठगांनी स्वीकारलेला आकृतिबंध वरून उथळ पण आतून तो अर्थसौंदर्याने, विचारसौंदर्याने ओतप्रोत भरलेला आहे.

## ७.३ 'अन्नदात्याची धुळाक्षरे'मधील आकृतिबंध : बळिराजाची अनेकविध रूपे साकारणारा :-

कवी भगवान ठग आपल्या कवितेतील प्रतिमांच्या माध्यमातून बळिराजाची अनेकविध रूपे साकार करतात. कवी ठग बळिराजाला कधी ईश्वराच्या रूपात तर कधी स्वामीच्या रूपात तर कधी काजव्याच्या रूपात उभे करतात.

| | | |
|---|---|---|
| **वेदना करूणा** | **मीच कास्तकार** | **एकटा काजवा** |
| **दैव चेंगरले** | **अवघ्या जगाचा** | **रात्रंदिन फिरे** |
| **नांगर मोडले** | **कोरड्या मातीचा** | **वावरात करे** |
| **ईश्वराचे** (पृ.५१) | **भूमीस्वामी** (पृ. ५६) | **देहत्याग** (पृ. ५८) |

बळिराजाला प्रतिमांच्या रूपात उभं करून त्याचे कर्म, सुख, दुःख, प्रेम, हर्ष, इच्छा, आकांक्षा, वेदना तपासून बघण्याचा कवी ठगांचा प्रयत्न ठळकपणे नजरेत भरतो.

## ७.४ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आकृतिबंधातून लोकसाहित्य व संत साहित्याला स्पर्श :-

संत साहित्य आणि लोक साहित्य हे मराठी साहित्यातील दोन्हीही प्रवाह कवी ठगांच्या जिव्हाळ्याचे प्रांत आहेत. म्हणूनच बळिराजाचा जीवनानुभव अभिव्यक्त करण्यासाठी त्यांनी 'अभंग' हा संतसाहित्यातील छंद प्रकार निवडून बळिराजाचे जीवन धारदारपणे, टोकदारपणे मांडले आहे. त्यामुळे आठशे वर्षानंतरही अभंगाची गोडी अवीट आहे याची प्रचिती त्यांच्या अभंगरूपी कवितेतून येते. मूळ शेतकरी कुटुंबातून मध्यम वर्गात स्थिर झालेले कवी भगवान ठग संतसाहित्याशी आणि लोकसाहित्याशी आपली वीण 'जन्म' या कवितेतून घट्ट असल्याचे संकेत देतात. अध्यात्म हा कवीच्या काव्याचा प्रांत नसला तरी त्याची सोबत केल्याशिवाय त्यांची कविता फुलत नाही.

| | | |
|---|---|---|
| **विठ्ठल रूपाची** | **ध्यानमग्न झाली** | **भक्तीरूप पीक** |
| **माझी काळी माती** | **ओवी वावरात** | **असे बहरले** |
| **आहे तिच्या हाती** | **बीज काकरात** | **भान हरपले** |
| **शेतकरी** | **तिच्या ठायी** | **रचनेचे** |
| (पृ. १४) | (पृ. १४) | (पृ. १४) |

प्रस्तुत पद्य पंक्तीतील पहिल्या चौपदीतील 'विठ्ठल', दुसऱ्या चौपदीतील 'ओवी' आणि तिसऱ्या चौपदीतील 'भक्ती' हे तीनही शब्द संतसाहित्य आणि लोकसाहित्यातील आहेत. अशा रचनेतून लोकसाहित्याचा आणि संतसाहित्याच्या जवळ घेऊन जाण्याचा कवीचा प्रयत्न स्तुत्य म्हणावा लागेल.

कवी भगवान ठग शेतकऱ्याचे आणि पंढरपूरच्या विठोबाचे हजारो वर्षापासून असलेले अतुट नाते आपल्याही कवितेत कायम ठेवतात.

**असे कसे झाले ?**
**पोरके कपाळ**
**हातामध्ये टाळ**
**विठोबाच्या** (पृ. ३०)

यावरून कवी भगवान ठगांना प्राचीन परंपरेविषयी जितका आदर आहे तितकीच प्राचीन परंपरा जतन करणे ही आपली जबाबदारी आहे हे ते विसरत नाहीत. याची प्रचिती पद्यपंक्तीतून येते.

संतसाहित्याचा आणि लोकसाहित्याचा जो अंश त्यांच्या अभंगरूपी कवितेत सापडतो. त्यासाठी कवी ठग कुठलाही अट्टाहास किंवा प्रयत्न करताना दिसत नाहीत. तर त्याच्या लेखणीतूनच तो आपोआप सहज व्यक्त होताना दिसतो.

संत साहित्य आणि लोकसाहित्य हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक आहे. ग्रामीण जीवन आणि मन संत साहित्याशी एकरूप झालेले असते. ग्रामीण मनाचा ज्याच्याशी जवळचा संबंध आहे तो अभंग आपल्या काव्यात आणण्यासाठीच त्यांनी अभंग आकृतिबंधाचा अवलंब केला असावा.

## ७.५ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील प्रतिमा व प्रतीके :-

आधुनिक मराठी कविता विशेषत: प्रतिमेच्या भाषेतून अधिक बोलताना जाणवते. इंग्रजीतील 'सिम्बॉलिझम' या शब्दावरून मराठीत 'प्रतिमा' हा शब्द रूढ झाला आहे. 'प्रतिमा' या शब्दाचा सर्वसामान्य अर्थ 'मूर्ती', 'चित्र', 'आकृती' असा आहे. तर 'सिम्बॉल' या इंग्रजी शब्दांवरून 'प्रतीक' हा शब्द मराठीत रूढ झाला आहे. 'प्रतीक' या शब्दाचा सर्वसामान्य अर्थ खूण, चिन्ह, उदाहरण असा आहे. कवी अनिलांसारखे प्रथितयश कवी काव्य प्रतिमांबद्दल लिहितात - ''प्रतिमांच्या निर्मितीने आशयाची अभिव्यक्ती करणे हे उत्तम काव्याचे वैशिष्ट्य आहे. काव्याचा गुणस्तर (रूढ शब्द दर्जेदारपणा) त्यातील प्रतिमा निर्मितीवर अवलंबून असतो. सहृदयाच्या मनात त्याचे प्रतिबिंब पडून आकलन झाले

म्हणजे त्यालाही भावनासंबंधीची जाणीव होते.''[८] याचा अर्थच असा की, प्रतिमांमुळे कविता समृद्ध संपन्न होते. शिवाय आकलनास सोपी जाते. कवी ठगांच्या कवितेतील प्रतीके व प्रतिमांचा शोध आपणाला याठिकाणी घ्यावयाचा आहे.

निसर्ग आणि निसर्गातील प्राणी, पशू, पक्षी हे बळीराजाचे जिवाभावाचे मैतर असतात. कवी भगवान ठगांनी आपल्या कवितेतून काजवा, मोर, राघू अशा प्राणी, पक्षी यांना स्थान दिल्याने कवितेत जिवंतपणा दिसून येतो.

**काजव्याचे थवे**
**कोवळा फुलोर**
**मनातला मोर**
**व्याकूळला** (पृ. ११)

यातून निसर्गातील प्राणी, पशू, पक्षी यांचे बळिराजाशी असलेले नाते आजही कायम असल्याची ती खूण आहे.

कवी भगवान ठगांचा कवितांतील प्रतिमा प्रदीर्घ आशयास आयाम प्राप्त करून देतात. 'मातीलाही' या कवितेतून 'नाक', 'सूर्य', 'डोळे' या दृश्य प्रतिमा चित्रीत झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| **डंखाची बेसर** | **निर्माण करतो** | **मारती फुंकर** |
| **काळाच्या नाकात** | **सूर्याची आकृती** | **शब्दांच्या डोळ्यात** |
| **घातल्या पायात** | **छोट्या छोट्या वाती** | **आणि विचारात** |
| **रक्तचाळ** | **विश्वभर** | **चूड लावी** |
| (पृ. १६) | (पृ. १६) | (पृ. १६) |

प्रस्तुत कवितेतील 'नाक' ही दृश्य प्रतिमा काळाचे मानवीकरण करण्यासाठी योजलेली आहे. तर 'सूर्य' ही प्रतिमा शेतकऱ्याचा उदारपणा प्रकट करण्यासाठी आली आहे. तर 'डोळे' ही दृश्य प्रतिमा शब्दाला मानवी रूप देऊन सजीवता बहाल करते. अशा प्रतिमांमुळे कवितेतील आशयाला विशिष्ट असा आयाम प्राप्त होतो.

कवी भगवान ठगांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधून जे जीवनानुभव अभिव्यक्त केले आहेत त्यातून असे लक्षात येते की, जीवनातील प्रत्येक अनुभवाकडे कवी ठग सूक्ष्मतेच्या नजरेतून पाहतात.

**दृष्टीला चकवा**<br>**असाच लागला**<br>**वासनेला आला**<br>**महापूर**<br>(पृ. २२)

**कुणासाठी व्हावा**<br>**विठ्ठल सावळा**<br>**आणि निळा काळा**<br>**चंद्रकडा**<br>(पृ. २२)

प्रस्तुत पद्यपंक्तीतून 'महापूर', 'विठ्ठल', 'चंद्र' या दृश्य प्रतिमा प्रकट झालेल्या आहेत. या प्रतिमांचा मूळ अर्थ आपण बघितला तर त्या प्रतिमांतून व्यापक असा अर्थ प्रकट होतो. त्यामुळे आशयाच्या दृष्टीने त्यांची कविता व्यापक रूप धारण करताना दिसते. अशा प्रतिमा निर्मितीतून त्यांची चिंतनशील वृत्ती प्रकट होते. म्हणून ठगांची कविता जितकी चिंतनशील तितकीच ती सखोल होताना दिसते.

बळिराजाच्या जीवनाची जी शोकांतिका झाली, त्याला बळिराजाच्या आयुष्यात नाठाळांचा झालेला प्रवेश कारणीभूत आहे. असे कवी ठग 'नाठाळ' या प्रतीकातून सूचित करतात.

**फुलांचे रडणे**<br>**ऋतु बावरणे**<br>**नाठाळांचे येणे**<br>**आयुष्यात** (पृ. ३३)

'नाठाळ' या प्रतीकांतून बळिराजाचे अडवणूक करणारे शासन, व्यापारी, सावकार, बँका इ. घटक प्रकट होतात. एवढे सगळे घटक त्यांनी 'नाठाळ' या प्रतीकांतून प्रतीत केले आहेत. हे त्यांच्या रचनेचे विशेष अंग आहे.

कवी भगवान ठग यांनी प्रतिमा आणि प्रतीके यांच्या माध्यमांतून बळिराजाचे संपूर्ण जीवन आपल्या कवितेतून उभे केले आहे.

### ७.६ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधून प्रतीत झालेले अलंकार :-

'अन्नदात्याची धुळाक्षरे' या कविता संग्रहातून कवी भगवान ठग यांनी रूपक, उपमा व चेतना-गुणोक्ती इ. अलंकारांचा समर्थपणे वापर केला आहे.

'जन्म' या कवितेत कवी भगवान ठग काळ्या मातीला विठ्ठलाच्या रूपाची 'उपमा' देतात आणि मातीची महानता प्रकट करतात.

**विठ्ठल रूपाची**

**माझी काळी माती**

**आहे तिच्या हाती**

**शेतकरी** (पृ. १४)

'विठ्ठल रूप' आणि काळी माती यातील साधर्म्य कवीने प्रतीत केले आहे. या ठिकाणी उपमा अलंकाराचे दर्शन घडते.

'काया' या कवितेतून काळाची दुर्गती, दुर्बलता प्रकट करण्यासाठी कवी काळाला मानवी रूप देऊन चेतना गुणोक्ती अलंकार साधतात.

**कुठे आली फुले**

**आणि पालवीत**

**काळाच्या पायात**

**सुज आली** (पृ. १५)

काळाच्या पायाला सूज येणे म्हणजेच येथे काळ मानवी रूप धारण करतो.

बळिराजाच्या जीवनात दु:ख किती ओतप्रोत भरलेले आहे याची प्रचिती कवी भगवान ठगांनी साधलेल्या रूपक अलंकारातून येते.

**देह झाला औत**

**मुके झाले दैव**

**आभाळाची शीव**

**कन्हारली** (पृ. ५१)

'देह' आणि औत हे भिन्न नाहीत तर ते एकच आहेत, असे वर्णन करून त्यांनी रूपक अलंकार तर साधलेला आहेच परंतु आपल्या कवितेचे सामर्थ्यही दाखविले आहे.

## ७.७ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील वाक्प्रचार सदृश्य रचना :-

आधुनिक कवितेमध्ये सार्वजनिक जीवनात विशिष्ट अर्थाने रूढ झालेल्या शब्दांचा (वाक्प्रचाराचा) अवलंब केला जाऊ लागला. कवी भगवान ठग यांनीही आपल्या कवितेतून वाक्प्रचार सदृश्य रचना अविष्कृत केल्या आहेत.

'कास्तकार' या कवितेतून 'दिवे पेटविणे' (कष्ट करणे), 'आभाळाची माती होणे' (आभाळ कोरडे पडणे/होणे), 'ग्लानी येणे' (मरगळ/थकवा येणे) अशा वाक्प्रचारसदृश्य रचना आढळतात. अशा रचनेमुळे कवितेचा वेगळेपणा नजरेत भरतो. शिवाय कवितेला वजन प्राप्त होते.

**रानामध्ये त्याने**
**पेटविले दिवे**
**पाखरांचे थवे**
**भुलले** (पृ. ७)

याशिवाय 'वाताहात' या कवितेतून 'वाती विझणे' (कार्य थांबणे), 'अक्षरांच्या गाठी ढिल्या करणे' (जाचक अटी शिथिल करणे) तर 'महापूर' या कवितेतून 'देहास वाळवी लागणे' (देह कुरतडणे), 'करुणेला महापूर येणे' (अतिशय दया वाटणे) अशा वाक्प्रचारसदृश्य रचना आढळतात.

## ७.८ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मध्ये हिंदी व संस्कृत भाषेतील शब्दांचे मिश्रण :-

'अन्नदात्याची धुळाक्षरे' मध्ये कवी भगवान ठग यांनी हिंदी व संस्कृत भाषेतील शब्दांचे मिश्रण केलेले दिसून येते. 'आत्मद्रोह' या कवितेत 'मृत' हा संस्कृत भाषेतील तर 'दर्प' हा हिंदी भाषेतील शब्द अविष्कृत झाला आहे. परंतु अशा स्वरूपाची उदाहरणे फारच कमी आहेत.

**कुठल्या फुलांना**
**उग्र दर्प येतो** (पृ. १७)

**गढळून गेले**
**काळ डोळे आज**
**आकाशात वीज**
**मृतवत** (पृ. १७)

## ७.९ 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधील आविष्काराचे स्वरूप :-

कवी भगवान ठग यांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' या कविता संग्रहातून बळीराजाचा जीवनानुभव ग्रामीण-नागरी मिश्रीत बोलीतून अविष्कृत केला आहे. कवी भगवान ठगांच्या कवितेतील आविष्कार शैली बघितल्यानंतर असे लक्षात येते, की त्यांच्या कवितेत चार चरणांची एक अशा पाच चौपदी येतात. तर काही ठिकाणी चार, तीन, दोन अशीही संख्या आहे. त्यांची प्रत्येक चौपदी ही संत साहित्यातील

मोठ्या अभंगाचे अनुकरण करताना दिसते. ''मोठ्या अभंगात'' चार चरण असून पहिल्या तीन चरणात सहा अक्षरे व चौथ्या चरणात चार अक्षरे असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणात यमक असते.

**लक्ष्मण भावोजी। मागे पुढे स्वामी । मज आहे धामी । ऐसे वाटी।** (६।६।६।४)

केव्हा केव्हा मोठ्या अभंगाच्या चार चरणांतील पहिल्या तीन चरणांत यमक असते.

**जाणावा तो ज्ञानी। पूर्ण समाधानी। निःसंदेह मनी। सर्वकाळ ।** (६।६।६।४)

''लहान अभंगाला दोन चरण असतात व प्रत्येक चरणांत सामान्यतः आठ अक्षरे असतात. क्वचित पहिल्या चरणांत सहा किंवा सात अक्षरे असतात. दुसऱ्या चरणात केव्हा केव्हा नऊ किंवा दहा अक्षरे असतात.''[९]

**अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।** (६।६।६।९)

**तुका म्हणे नाव । जनकासाठी उदकी ठाव।** (६।६।६।९)

मोठ्या अभंगात असलेली सर्व लक्षणे कवी भगवान ठगांच्या अभंगरूपी कवितेत आढळतात.

**अवघा मुलामा**
**लावून देतात**
**आणि फेकतात**
**विष थेंब** (पृ. १२) (६।६।६।४)

अभंगाला जशी विशिष्ट लय, नाद, ठेका असतो, तसा भगवान ठगांच्या अभंगरूपी कवितेतही लय, नाद, ठेका दिसून येतो.

**कुशीमध्ये माती**
**मातीत वैभव**
**तरीही आर्जव**
**कशासाठी** (पृ. ९)

कवी भगवान ठग बळिराजाचा जीवनानुभव व्यक्त करताना कधी अस्सल ग्रामीण तर कधी अस्सल प्रमाण शब्द वापरताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कवितेचा घाट हा ग्रामीण नागरी-मिश्रीत बोलीनी व्याप्त आहे.

**सारे तपशील**

**वेंधळे वेंधळे**

**सिद्धांत सगळे**

**दगाबाज** (पृ. २४)

या पद्य पंक्तीतील 'वेंधळे', 'दगाबाज' हे शब्द अस्सल ग्रामीण आहेत. तर सिद्धांत हा शब्द प्रमाण भाषेतील आहे. याशिवाय सांड, भाबडी, धुराळा, आकाश, वीज, वंश, बीज, तळे, पाणी, माती इ. शब्द आढळतात.

**दु:ख आणि दैन्य**

**कायद्याचा कावा**

**अक्षराचा दिवा**

**जीर्णशीर्ण** (पृ. २४)

या पद्य पंक्तीतील 'कावा', 'दिवा' हे अस्सल ग्रामीण शब्द तर 'कायदा', 'जीर्णशीर्ण' हे अस्सल प्रमाण भाषेतील शब्द आहेत. त्यामुळे भगवान ठगांची आविष्कारशैली अस्सल ग्रामीणत्वाचा बाज धारण करत नाही. परिणामी त्यांची कविता चटकन भावते. परंतु चटकन समजून येत नाही. अशा तुरळक प्रमाणात मर्यादाही त्यांच्या कवितेत दिसून येतात.

## ८. निष्कर्ष :-

१. कवी भगवान ठग यांच्या कवितेत बळिराजाचे दु:ख केंद्रस्थानी आहे.

२. कवी ठगांची कविता वाचकाला अंतर्मुख होऊन चिंतन करायला लावते.

३. कवी ठगांची कविता बळिराजाची सोशिकवृत्ती, संयमीवृत्ती प्रकट करते.

४. कवी ठगांच्या कवितेत आक्रमकता, आवेश, विद्रोह आढळत नाही.

५. प्रतिमा, प्रतीके आणि अलंकार हे त्यांच्या कवितेचे बलस्थान आहे.

६. कवी ठगांच्या कवितेत शृंगार, भावनांची उत्कटता, कल्पना विलास, अवास्तवता ह्या गोष्टी फारशा आढळत नाहीत.

७. कवी ठगांची कविता लोकसाहित्य, संतसाहित्याला स्पर्श करणारी आहे.

८. कवी भगवान ठगांची अभ्यासू, चिंतनशील, डोळसवृत्ती त्यांच्या कवितेतून प्रकट होते.

९. ठगांच्या कवितेत भावनेपेक्षा विचाराला अधिक प्राधान्य आहे.

१०. बळिराजाचे जीवन, त्याचे दुःख, त्याची वेदना अभंग आकृतिबंधातून किती प्रभावीपणे, धारदारपणे व्यक्त करता येते. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे कवी भगवान ठगांचा प्रस्तुत कवितासंग्रह होय.

११. ठगांच्या कवितेत संस्कृत-हिंदी मिश्रित शब्दांचे उपयोजन दिसून येते. मात्र त्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. यादव आनंद - 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटजवळ, पुणे ४११ ०३०, प्रथमावृत्ती - ६ मे १९८१, पृ. १३३-१३५

२. यादव आनंद - 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ४११ ०३०, प्रथमावृत्ती - १९७९, पृ. ६

३. नलगे (संपा.) चंद्रकुमार - 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', रमेश एजन्सी, २०५ शुक्रवार पेठ, काळ्या हौदाजवळ, पुणे - २ प्रथमावृत्ती, सप्टेंबर १९९६, पृ. २२३

४. पवार (प्राचार्य) पंडितराव - 'मराठी कविता आकलन आणि आस्वाद', दास्ताने रामचंद्र आणि कं. ८३० सदाशिव पेठ, पुणे, ४११ ०३०, आवृत्ती १४ जानेवारी २००५, पृ. २६३.

५. यादव आनंद - 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', उनि. पृ. ५८

६. सार्वेकर कैलास - 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, पृ. १९५

७. पवार (प्राचार्य) पंडितराव - 'मराठी कविता आकलन आणि आस्वाद', उनि. पृ.२०, २१

८. पवार (प्राचार्य) पंडितराव (संपा.) - 'कवी अनिलांची साहित्यदृष्टी', प्रतिमा प्रकाशन, पुणे २०००, पृ. १५७

९. वाळंबे (कै) मो. रा. - 'सुगम मराठी व्याकरण लेखन', नितीन प्रकाशन, पुणे - ४११ ०३०, आवृत्ती जानेवारी २००५, पृ.१६६.


-----x-----